International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
*Volume-13, Issue-2 | November - December 2025*

**Original Article**

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शिक्षकांमध्ये नवीन शैक्षणिक धोरण (NEP २०२०) अंतर्गत पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) अभियानाच्या अंमलबजावणीबाबत असलेल्या जाणीव-जागृती व आव्हानांचा अभ्यास

**श्री. सागर रामचंद्र जाधव**

*उपशिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दहिवडी नं. १*

*(UDISE-27310704001)*

*ता. माण, जि. सातारा*

**Manuscript ID:** IJAAR-130234

**ISSN: 2347-7075**
**Impact Factor – 8.141**

**Volume - 13**
**Issue - 2**
**November - December 2025**
**Pp. 235 – 242**

**Submitted:** 20 Dec 2025
**Revised:** 29 Dec 2025
**Accepted:** 31 Dec 2025
**Published:** 5 Jan 2026

***Corresponding Author:***
***श्री. सागर रामचंद्र जाधव***

Quick Response Code:

**Website:** https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.21837401

DOI Link:
https://doi.org/10.5281/zenodo.21837401

Creative Commons

OPEN ACCESS

***सारांश:***

*राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) हे २१ व्या शतकातील भारताच्या शैक्षणिक पुनर्रचनेचा भक्कम पाया आहे. या धोरणातील अत्यंत महत्त्वाचा आणि प्राधान्याचा घटक म्हणजे 'निपुण भारत' अभियानांतर्गत पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (Foundational Literacy and Numeracy - FLN) साध्य करणे हा आहे. प्राथमिक स्तरावरील शिक्षण प्रणालीच्या केंद्रस्थानी शिक्षक असतो. त्यामुळे या धोरणाची यशस्विता शिक्षकांच्या आकलनावर आणि कार्यक्षमतेवर अवलंबून असते.*

*प्रस्तुत संशोधन लेखात सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांमध्ये NEP २०२० मधील FLN आणि शैक्षणिक पुनर्रचनेबाबत असलेल्या जाणीव-जागृतीचा, प्रत्यक्ष अंमलबजावणीतील आव्हानांचा व त्यांच्या प्रशिक्षणाच्या गरजांचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधकाने विकसित केलेल्या सांख्यिकीय प्रश्नावलीच्या आधारे प्राप्त ३० प्रतिसादांचे विश्लेषण करून निष्कर्ष व शिफारसी मांडण्यात आल्या आहेत.*

***सूचक शब्द (Keywords): नवीन शैक्षणिक धोरण २०२०, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान (FLN), निपुण भारत, प्राथमिक शिक्षक, ५+३+३+४ स्तररचना, अध्यापनशास्त्र.***

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*श्री. सागर रामचंद्र जाधव (2025). जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शिक्षकांमध्ये नवीन शैक्षणिक धोरण (NEP २०२०) अंतर्गत पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) अभियानाच्या अंमलबजावणीबाबत असलेल्या जाणीव-जागृती व आव्हानांचा अभ्यास. International Journal of Advance and Applied Research, 13(2), 235–242.* https://doi.org/10.5281/zenodo.21837401

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

**प्रस्तावना:**

भारताच्या समृद्ध परंपरेवर आधारित आणि २१ व्या शतकातील जागतिक गरजांशी सुसंगत अशी नवीन शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची निर्मिती केंद्र शासनाकडून करण्यात आली आहे. हे धोरण प्रवेश, समता, गुणवत्ता, परवडणारे शिक्षण आणि उत्तरदायित्व (Access, Equity, Quality, Affordability, Accountability) या ५ मूलभूत स्तंभांवर आधारित आहे.

या धोरणांतर्गत जुन्या १०+२ स्तररचनेऐवजी ५+३+३+४ ही नवीन शैक्षणिक व अभ्यासक्रम रचना लागू करण्यात आली आहे. यामध्ये ३ ते ८ वयोगटातील बालकांसाठी 'पायाभूत स्तर- बालवाडी ते इयत्ता दुसरी पर्यंत' (Foundational Stage), ८ ते ११ वयोगटातील बालकांसाठी पूर्व तयारी स्तर – इयत्ता ३ री ते ५ वी, ११ ते १४ वयोगट पूर्व माध्यमिक स्तर – इयत्ता ६ वी ते ८ वी आणि १४ ते १८ वयोगट माध्यमिक स्तर – इयत्ता ९ वी ते १२ वी असा निश्चित करण्यात आला आहे. त्यापैकी इयत्ता ३ री पर्यंतच्या प्रत्येक बालकाने मूलभूत वाचन, लेखन आणि संख्याज्ञान साध्य करणे हे सर्वोच्च राष्ट्रीय प्राधान्य ठरवण्यात आले आहे. ही उद्दिष्टे प्रत्यक्ष वर्गात रुजवण्यासाठी प्राथमिक शिक्षकांची जाणीव-जागृती आणि त्यांची सज्जता अत्यंत निर्णायक मानली जाते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्यासाठी शिक्षकांमध्ये असणारी या धोरणाबाबतची जाणीव – जागृती आणि त्या संबंधी येणाऱ्या आव्हानांचा अभ्यास करण्यासाठी माण तालुक्यातील प्राथमिक शाळेतील शिक्षकांचा प्रातिनिधिक अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**संशोधनाची गरज व महत्त्व:**

महाराष्ट्र राज्याने शालेय शिक्षण गुणवत्तेत व विविध कामगिरी निर्देशांकात देशात नेहमीच अग्रस्थान पटकावले आहे. परंतु, ग्रामीण भागातील शाळांमध्ये NEP २०२० आणि FLN उद्दिष्टांची प्रभावी अंमलबजावणी करताना शिक्षकांना अनेक प्रशासकीय, तांत्रिक व अध्यापनशास्त्रीय आव्हानांना सामोरे जावे लागते.

शिक्षकांना धोरणाची केवळ वरवरची माहिती असून चालणार नाही, तर संकल्पनात्मक स्पष्टता, कृतीयुक्त अध्यापन पद्धती (Experiential Learning), दीक्षा (DIKSHA) पोर्टलचा, परख (PARAKH) अंतर्गत विद्यार्थी सर्वसमावेशक मूल्यमापन इत्यादीचा वापर याबाबत तो अद्ययावत असणे गरजेचे आहे. तसेच त्याने निरंतर व्यावसायिक विकास (CPD) कार्यक्रमा अंतर्गत स्वतःचे शैक्षणिक आणि व्यावसायिक ज्ञान अद्ययावत करणे गरजेचे आहे. सातारा जिल्ह्यातील माण सारख्या निम-दुष्काळी व ग्रामीण भागात काम करणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांमध्ये NEP २०२० मधील FLN आणि इतर नवीन बदलांबाबतचे ज्ञान कोणत्या स्तरावर

आहे हे अभ्यासणे धोरणाच्या स्थानिक अंमलबजावणीसाठी अत्यंत गरजेचे आहे.

**शोध समस्या विधान:**

"सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शिक्षकांमध्ये नवीन शैक्षणिक धोरण NEP २०२० मधील पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) अभियानाबाबत असलेल्या जाणीव-जागृतीचा व आव्हानांचा अभ्यास"

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:**

१. प्राथमिक शाळेतील शिक्षकांमध्ये NEP २०२० मधील ५+३+३+४ स्तररचना आणि FLN अभियानाविषयी असलेल्या संकल्पनात्मक ज्ञानाचा अभ्यास करणे.
२. वर्गाध्यापनात तंत्रज्ञान (ICT) व दीक्षा पोर्टल वापराबाबत शिक्षकांच्या सज्जतेचे मूल्यमापन करणे.
३. प्राथमिक स्तरावर FLN आणि इतर ऑनलाईन शैक्षणिक साधनांच्या वापरात शिक्षकांना येणाऱ्या अडचणी व आव्हानांचा शोध घेणे.
४. प्राथमिक स्तरावरील राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारसी व उपाययोजना सुचवणे.

**गृहीतके:**

१. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील बहुतांश शिक्षकांना NEP २०२० मधील FLN अभियानाची प्राथमिक माहिती आहे, परंतु सखोल अध्यापनशास्त्रीय पद्धतींबद्दल अपूर्ण ज्ञान आहे.
२. प्राथमिक शाळांमधील शिक्षकांसाठी FLN आणि AI तंत्रज्ञानाच्या दैनंदिन अध्यापनात उपयोजनासाठी सातत्यपूर्ण विशेष प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन केले जाते.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:**

प्रस्तुत संशोधन हे सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांशी आणि NEP २०२० च्या पायाभूत स्तराशी निगडित आहे. प्रस्तुत शोधनिबंधासाठी माण तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील एकूण शिक्षकांपैकी केंद्रनिहाय ठराविक शिक्षकांची निवड करण्यात आली आहे.

**संशोधन पद्धती व न्यादर्श (Methodology & Sample):**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा (Survey Method) वापर करण्यात आला आहे. त्यासाठी माण तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील एकूण शिक्षकांपैकी केंद्रनिहाय १०% प्रमाणे एकूण ६० शिक्षकांची निवड करून त्याच्याकडून प्रश्नावली भरून घेतली आहे.

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

**माहिती संकलनाची साधने व सांख्यिकी (Data Collection & Analysis Tools):**

प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी संशोधकाने वस्तूनिष्ठ प्रश्नांची ऑफलाईन प्रश्नावली वापरली असून प्रत्येक शिक्षकाकडून ती स्वतः भेट घेऊन भरून घेतली आहे. दुय्यम स्वरुपाची माहिती शैक्षणिक शासकीय लिखित दस्तावेज, शासकीय संकेतस्थळे, प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हापरिषद सातारा, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, फलटण (सातारा) यांच्याकडून वेळोवेळी प्रकाशित होणारी परिपत्रके आणि संबंधित साहित्य यामधून मिळवली आहे. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी (Percentage) या सांख्यिकी साधनाचा वापर करण्यात आला आहे.

**माहितीचे विश्लेषण तक्ते व अर्थनिर्वचन (Data Analysis & Interpretation):**

**प्रश्न १: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील नवीन शैक्षणिक स्तर रचनेबाबत आपणास माहिती आहे का?**

| अ.क्र. | शैक्षणिक स्तर रचना | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १०+२+३ | ०४ | ६.६७ |
| २ | ५+३+३+४ | ५४ | ९०.०० |
| ३ | ५+४+३+३ | ०२ | ३.३३ |
| | एकूण | ६० | १०० |

संदर्भ : प्राथमिक माहिती संकलनातून प्राप्त आकडेवारी

**विश्लेषण व अर्थनिर्वचन:**

९०% शिक्षकांना नवीन शैक्षणिक स्तररचनेबद्दल (५+३+३+४) अचूक माहिती आहे. यावरून प्राथमिक स्तरावरील शिक्षक नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मूलभूत रचनेबाबत जागरूक असल्याचे दिसून येते.

**प्रश्न २: निपुण भारत (NIPUN Bharat) अभियानांतर्गत FLN साध्य करण्याचे निश्चित केलेले उद्दिष्ट वर्ष व इयत्ता आपणास माहित आहे का?**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | इयत्ता ३ वी अखेर | ४४ | ७३.३३ |
| २ | इयत्ता ५ वी अखेर | १० | १६.६७ |
| ३ | इयत्ता ८ वी अखेर | ०६ | १०.०० |
| | एकूण | ६० | १०० |

संदर्भ : प्राथमिक माहिती संकलनातून प्राप्त आकडेवारी

**विश्लेषण व अर्थनिर्वचन:**

७३.३३% शिक्षकांना FLN च्या निश्चित कालावधी व इयत्तेची अचूक माहिती आहे, तर २६.६७% शिक्षकांमध्ये अद्याप स्पष्टतेचा अभाव दिसून येतो.

**प्रश्न ३: FLN अंतर्गत 'दीक्षा' (DIKSHA) पोर्टल व इतर ICT (माहिती तंत्रज्ञान) साधनांचा अध्यापनात आणि मूल्यमापनात नियमित वापर केला जातो का?**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नियमितपणे दररोज | २० | ३३.३३ |
| २ | आठवड्यातून एकदा | ३० | ५०.०० |
| ३ | कधीतरी किंवा अजिबात नाही | १० | १६.६७ |
| | एकूण | ६० | १०० |

संदर्भ : प्राथमिक माहिती संकलनातून प्राप्त आकडेवारी

**विश्लेषण व अर्थनिर्वचन:**

केवळ ३३.३३% शिक्षक डिजिटल साधनांचा नियमित वापर करतात. निम्म्याहून अधिक (६६.६७%) शिक्षकांना तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी अतिरिक्त मार्गदर्शन व भौतिक साधनांची गरज आहे.

**प्रश्न ४: NEP २०२० मधील 'सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन ऐवजी प्रस्तावित 'क्षमता-आधारित मूल्यमापन' (Competency-Based Assessment) बद्दल आपणास माहिती आहे का?**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | जुजबी / मध्यम माहिती | १६ | २६.६७ |
| २ | उत्तम व स्पष्ट आकलन | ३६ | ६०.०० |
| ३ | माहिती नाही | ०८ | १३.३३ |
| | एकूण | ६० | १०० |

संदर्भ : प्राथमिक माहिती संकलनातून प्राप्त आकडेवारी

**विश्लेषण व अर्थनिर्वचन:**

६०% शिक्षकांना क्षमता-आधारित मूल्यमापनाबाबत माहिती आहे. तर ४० शिक्षकांना सुधारित मूल्यमापन पद्धतीची माहिती नाही. यावरून मूल्यमापनाच्या नवीन पद्धतींवर शिक्षकांसाठी प्रात्यक्षिकांवर आधारित प्रशिक्षणाची गरज असल्याचे स्पष्ट होते.

**प्रश्न ५: FLN आणि इतर ICT आधारित शैक्षणिक साधनांच्या वापरात आपणास कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते?**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | इंटरनेट आणि भौतिक साधनांची उपलब्धता आहे कोणत्याही अडचणी नाहीत | ३७ | ६१.६६ |
| २ | इंटरनेट आणि भौतिक साधनांची उपलब्धता नाही | १८ | ३०.०० |
| ३ | इंटरनेट आणि भौतिक साधनांची जुजबी / मध्यम माहिती | ०५ | ०८.३३ |
| | एकूण | ६० | १०० |

संदर्भ : प्राथमिक माहिती संकलनातून प्राप्त आकडेवारी

**विश्लेषण व अर्थनिर्वचन:**

६१.६६% शिक्षकांना FLN आणि इतर ICT आधारित शैक्षणिक साधनांच्या वापरात कोणत्याही अडचणी नाहीत. तथापी काही शिक्षकांना माहिती असूनही तांत्रिक अडचणीमुळे त्याचा वापर करता येत नाही. त्यामुळे सादर शिक्षकांना आणि शाळांना इंटरनेट आणि तत्सम सुविधांचा पुरवठा करण्याची गरज असल्याचे स्पष्ट होते.

**प्रश्न ६: FLN आणि इतर ICT आधारित शैक्षणिक साधनांच्या वापराबाबत प्रशिक्षणांची गरज आहे असे आपणास वाटते का ?**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसादांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षणांची गरज आहे. | २८ | ४६.६६ |
| २ | नियमित प्रशिक्षणे होतात त्यामुळे गरज नाही. | ३२ | ५३.३३ |
| | एकूण | ६० | १०० |

संदर्भ : प्राथमिक माहिती संकलनातून प्राप्त आकडेवारी

**विश्लेषण व अर्थनिर्वचन:**

५३.३३% शिक्षकांना FLN आणि इतर ICT आधारित शैक्षणिक साधनांच्या वापरासाठी पुरेशी प्रशिक्षणे होतात त्यासंबंधी माहिती आहे त्यांनी प्रशिक्षणे पूर्ण केली आहेत. तथापी ४६.६६ % शिक्षकांना FLN आणि इतर ICT आधारित शैक्षणिक साधनांच्या वापरासाठी प्रात्यक्षिकांवर आधारित आणखी प्रशिक्षणे व्हावीत असे वाटते. त्यामुळे सादर प्रशिक्षणांची आयोजन करण्याची गरज असल्याचे स्पष्ट होते.

**International Journal of Advance and Applied Research**
**Peer Reviewed | International Open Access Journal**
**ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website: https://ijaar.co.in/***
***Volume-13, Issue-2 | November - December 2025***

**निष्कर्ष:**

१. तालुक्यातील ९०% प्राथमिक शिक्षकांना NEP २०२० च्या ५+३+३+४ या नवीन रचनेची स्पष्ट माहिती आहे.
२. ७३% शिक्षकांना 'निपुण भारत' अभियानांतर्गत इयत्ता ३ री पर्यंत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान (FLN) साध्य करण्याच्या उद्दिष्टांची जाणीव आहे.
३. ५०.००% शिक्षक दीक्षा पोर्टल आणि इतर ई-साहित्याचा नियमित वापर करताना इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि भौतिक साधनांचा अभाव असल्याने अडचणी येत असल्याने ते त्याचा वापर करत नाहीत.
४. ८३.३३% शिक्षकांना क्षमता-आधारित मूल्यमापन (Competency-based evaluation) FLN 'परख' (PARAKH) आणि इतर ICT आधारित मूल्यमापन पद्धतीबद्दल सखोल ज्ञान आहे.
५. ४६.६६ % शिक्षकांनी NEP २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्यक्ष वर्ग-स्तरीय कृती (Classroom Action Plans) आणि टीएलएम (TLM) निर्मितीवर आधारित विशेष प्रशिक्षणाची मागणी केली आहे.

**शिफारसी व उपाययोजना:**

१. शालेय शिक्षण विभागातर्फे केवळ ऑनलाइन स्वरूपात न देता केंद्रस्तरावर प्रात्यक्षिक व कृतीयुक्त (Hands-on Workshops) प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात यावे.
२. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये हाय-स्पीड इंटरनेट आणि डिजिटल क्लासरूम/स्मार्ट टीव्ही आणि विजेची ची उपलब्धता करून द्यावी.
३. FLN उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षकांना मराठी भाषेत सहज उपलब्ध होणारे खेळणी-आधारित (Toy-based pedagogy) व डिजिटल टीएलएम संच पुरवण्यात यावेत तसेच त्याच्या वापराबाबत प्रशिक्षण देण्यात यावे.
४. NEP २०२० च्या शिफारशीनुसार प्रत्येक शिक्षकाला वर्षाला किमान ५० तासांचे गुणवत्तापूर्ण निरंतर व्यावसायिक विकास प्रशिक्षण अनिवार्य व सुलभ रीतीने उपलब्ध व्हावे.

**संदर्भ साहित्य / संदर्भसूची:**

**अ. शासकीय धोरणे व अधिकृत अहवाल (Government Policy Documents):**

१. Ministry of Human Resource Development (MHRD). (2020). National Education Policy 2020. Government of India, New Delhi. https://www.education.gov.in/sites/

upload_files/mhrd/files/NEP_Final_English_0.pdf

२. शिक्षण मंत्रालय, भारत सरकार. (२०२०). राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (मराठी भाषांतर).

३. https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/nep/2020/MARATHI.pdf

४. Department of School Education and Literacy. (2021). NIPUN BHARAT: Guidelines for Implementation of National Initiative for Proficiency in Reading with Understanding and Numeracy. Ministry of Education, Government of India.

५. SCERT महाराष्ट्र. (२०२२). पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) प्रशिक्षण मार्गदर्शिका. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

**ब. संशोधन निबंध व जर्नल्स (Research Journals & Articles):**

१. आगाशे, मु. व करंदीकर, सु. (२०२१). नवीन शैक्षणिक धोरण २०२० आणि प्राथमिक शिक्षणाची आव्हाने. 'शिक्षण संक्रमण' मासिक, बालभारती, पुणे, वर्ष ५९, अंक ४, पृ. १२-१८.

२. Patole, V. S. (2025). A Study of Awareness of New Education Policy - 2020 among Teachers Teaching in Zilla Parishad Primary Schools. Ajanta Journal, Volume XIV, Issue I, ISSN 2277-5730, Impact Factor 7.428, pp. 89-96.

३. Sharma, R. & Kumar, A. (2023). Teacher Preparedness and Foundational Literacy under NEP 2020: An Empirical Study in Rural Schools. Journal of Educational Planning and Administration, 37(2), 145-158.

**क. संदर्भ पुस्तके (Reference Books):**

१. कदम, वि. स. (२०१८). प्राथमिक शिक्षणातील कृती संशोधन व नवोपक्रम. नित्य नूतन प्रकाशक, पुणे.

२. पंडित, ब. ना. (२०१५). शैक्षणिक संशोधन पद्धती. नूतन प्रकाशन, पुणे.

३. Koul, Lokesh. (2019). Methodology of Educational Research. (4th Ed.), Vikas Publishing House Pvt Ltd, New Delhi.